# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

उत्तर पुणे जिल्हा ७ पुढारी | पुणे, बुधवार २ सप्टेंबर २०१५

# किडनी विकारग्रस्ताला विद्यार्थ्यांची आर्थिक मदत

## दानशूरांकडून मदतीचे आवाहन

**कडूस : वार्ताहर**

किडनीच्या विकाराने एक वर्षापासून आजारी असणाऱ्या व्यक्तीला राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आर्थिक स्वरूपात मदत गोळा करून कुटुंबीयांकडे सुपूर्त केली.

राजगुरुनगर येथील ४२ वर्षीय मुकुंद शंकर सदरे यांना एक वर्षापासून किडनीचा आजार झाल्याचे निदान झाले. समाजातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी गरीब कुटुंबातील प्रमुख असणाऱ्या मुकुंद सदरे यांच्या मदतीसाठी धाव घेतली. कुटुंबातील प्रमुख कर्ती पत्नीने खासदार-आमदार यांच्याकडे मदतीसाठी धाव घेतली; परंतु या आजारावर निधी उपलब्ध करून देण्याबाबत प्रतिसाद मिळाला नाही. चार लाख रुपये खर्च येणार असल्याने राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत या आजाराचा समावेश नाही. अखेर हतबल झालेल्या गौरी सदरे यांनी ससून, डी. वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये चौकशी केली; परंतु प्रतिसाद मिळाला नाही.

अखेर शहरातील दानशूर व्यक्तींकडे मदतीसाठी धाव घ्यावी लागली. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील मुला-मुलींनी कॉलेजमधील विद्यार्थ्यांना आवाहन करून निधी जमवून प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्याहस्ते गौरी सदरे यांच्याकडे सुपूर्त केला. या वेळी विद्यार्थी प्रतिनिधी आकाश नवरे, काजल बोऱ्हाडे, भूषण सांडभोर, कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळुक, देवराम पोतेकर आदी उपस्थित होते.

समाजातील विविध संस्था, धर्मादाय ट्रस्ट यांनी कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्याचे आवाहन गौरी सदरे यांनी केले असून, मोबाईल क्रमांक ९२७०६९८६८७ असा आहे. बँक ऑफ महाराष्ट्र, राजगुरुनगर शाखेतील २०१०३८७४५४३ असा खाते क्रमांक आहे.



**राजगुरुनगर येथील मुकुंद सदरे यांच्या औषधोपचारांसाठी मदतनिधी गोळा करून सौ. गौरी सदरे यांच्याकडे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या हस्ते सुपूर्त केला.**

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख